# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ६५–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. रघुनाथ रामू शिंदे,<br>मु. पो. कोसारी, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय जत, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. रघुनाथ रामू शिंदे, मु.पो. कोसारी, ता. जत, जि. सांगली यांनी घरगुती वीज कनेक्शनसाठी कोटेशन मिळावे व कोटेशन विलंबासाठी नुकसान भरपाई मिळावी अशा मागणीचा अर्ज ग्राहक मंचाकडे दि. ९.३.२०१० या तारखेने नोंदविला आहे. सदरचा अर्ज मंचात दाखल करुन मंचाने पुढील कार्यवाही चालू केली व दि. ३.५.२०१० रोजी मंच कार्यालयात सुनावणी घेण्यासाठीचा दिवस निश्चित केला. तसेच उभयतांना नोटीसीने कळविले. सुनावणीच्यावेळी तक्रारदार ग्राहक गैरहजर होते. वि.प.चे संबंधित अधिकारी उपस्थित होते. त्यांनी केलेले कथन, पूर्वीच कामामध्ये दाखल केलेला मुद्देनिहाय अभिप्राय, ग्राहकाने कक्षामध्ये दि. १८.१.२०१० रोजी केलेला अर्ज तसेच मंचामध्ये ‘ अ ‘ नमुना मागणी अर्जातील मागणीचे स्वरुप याचा विचार करुन मंच खालील निष्कर्षाप्रत पोहोचला आहे.

श्री. रघुनाथ रामू शिंदे यांनी घरगुती वीज जोडणीसाठी वि.प.कडे दि. १५.१.२०१० रोजी ए १ फॉर्ममध्ये अर्ज करुन आपल्या घरगुती वीज जोडणीची मागणी नोंदविली आहे. त्याबरहूकूम वि.प.ने दि. १२.३.२०१० रोजी ग्राहकास चलन दिले आहे. सदर चलनाची रक्कम दि. १५.३.२०१० रोजी ग्राहकाने वि.प.कडे जमा केली आहे, तसेच दि.१७.३.२०१० रोजी चाचणी अहवाल दिलेला आहे. त्यामुळे ग्राहकाकडून अपेक्षित कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर कृती मानकातील तरतुदीप्रमाणे विहित मुदतीत जोडणी देण्यात येईल असे निवेदन वि.प.ने अभिप्रायात व्यक्त केले आहे. या सर्व बाबीमध्ये अभिप्रायासोबत वि.प.ने फर्म कोटेशन जोडले असते तर तांत्रिक व्यवस्थेबद्दलची माहती मंचास ज्ञात झाली असती, म्हणजेच किती दिवसांचे कालावधीमध्ये जोडणी द्यावयाची हे निश्चित करता आले असते, पण वि.प.ने तशी माहिती मंचास पुरविलेली नाही. त्यामुळे चलन देण्यास झालेला विलंब दि. १५.२.२०१० ते दि. १३.३.२०१० हा निश्चित करुन ४ आठवड्यांसाठी प्रति आठवडा रु. १००/- या प्रमाणे रु. ४०० /- भरपाई देणेत यावी असे मंच निश्चित करीत आहे. त्याचप्रमाणे वाहिनीचा विस्तार गृहीत धरुन चाचणी अहवाल दि. १७.३.२०१० रोजी दिला असल्याने दि. १६.६.२०१० पर्यंत वीज जोडणी देण्यात यावी असे स्पष्ट करण्यात येत आहे. मंच खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) विलंबाच्या ४ आठवड्यांसाठी प्रति आठवडा रु. १०० या प्रमाणे रु. ४०० इतकी भरपाईची रक्कम वि.प.ने ग्राहकास अदा करावी.

२) दि. १७.३.२०१० रोजी चाचणी अहवालाची पूर्तता ग्राहकाने केली असल्याने वाहिनीचा विस्तार गृहीत धरुन ३ महिन्याचे मुदतीत म्हणजे दि. १६.६.२०१० पर्यंत ग्राहकास वीज जोडणी देणेत यावी.

३) वीज जोडणी दिल्यानंतर पहिल्या बिलींग सायकलमध्ये सदरच्या रकमेचे समायोजन करण्यात यावे.

४) वीज जोडणी दिलेला अहवाल व समायोजन केलेला तपशील मंचास अंमलबजावणी स्वरुपात कळवावा.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( जी. सी. लेले )

सदस्य

श्री. बी. जी. पवार, अध्यक्ष :

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :